❍ दि. २६ जानेवारी २०२६
❍ सोमवार
❍ वर्ष ४ थे
❍ अंक ८७
❍ किंमत २ रूपये
❍ पृष्ठे ४
❍ लातूर
❍ RNINO.MHMAR/25/A1409

# दैनिक अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे    उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in




### आजचे पंचाग

❍ दिनांक : २६ जानेवारी २०२६
❍ वार : सोमवार
❍ माह (अमावस्यांत) : माघ
❍ माह (पूर्णिमांत) : माघ
❍ ऋतु : शिशिर
❍ आयन : उत्तरायण
❍ पक्ष : शुक्ल पक्ष
❍ तिथी : सप्तमी तिथी (रात्री ११:१० पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी
❍ नक्षत्र : रेवती नक्षत्र (दुपारी ०१:३५ पर्यंत) त्यानंतर अश्विनी न क्षत्र
❍ योग : सिद्ध योग (सकाळी ११:४५ पर्यंत) त्यानंतर साध्य योग
❍ करण : गराजा करण (सकाळी ११:५७ पर्यंत) त्यानंतर वाणीजा करण
❍ चंद्र राशी : मीन राशी (दुपारी ०१:३५ पर्यंत) त्यानंतर मेष राशी
❍ सूर्य राशी : मकर राशी
❍ अशुभ मुहुर्त:
❍ राहु काळ : संध्याकाळी ०५:०२ ते संध्याकाळी ०६:२६ पर्यंत
❍ शुभ मुहुर्त:
❍ अभिजित : दुपारी १२:२९ ते दुपारी ०१:१३
❍ सूर्योदय : सकाळी ०७:१६
❍ सूर्यास्त : सायंकाळी ०६:२६
❍ संवत्सर : विश्वावसु
❍ संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
❍ विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
❍ शक संवत: १९४७ शक संवत

## पद्म पुरस्कारांची घोषणा

### महाराष्ट्रातील रघुवीर खेडकर, आर्मिडा फर्नांडिस आणि श्रीरंग लाड यांना पद्मश्री

नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी केंद्र सरकारने २०२६ च्या ४५ पद्म पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा केली आहे. देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक अशी या पुरस्कारांची ओळख आहे. यामुळे हा पुरस्कार मिळणे ही गौरवाची बाब आहे. यंदा महाराष्ट्रातील चार जणांना पद्म पुरस्कार जाहीर झाला आहे. लोकनाट्य क्षेत्रातले तमाशा कलाकार रघुवीर खेडकर आणि कृषी क्षेत्रात कार्यरत असलेले श्रीरंग लाड तसेच पालघरमधील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या ढिंका यांना पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. आशियातील पहिली रक्तपेढी स्थापन करणाऱ्या मुंबईच्या आर्मिडा फर्नांडिस यांनाही पद्म पुरस्कार जाहीर झाला आहे.




पद्मश्री पुरस्कार विजेते २०२६

आर्मिडा फर्नांडिस (मुंबई) – आशियातील पहिली रक्तपेढी स्थापन करण्यात मोलाचे योगदान अंके गौडा– भारतातील सर्वात मोठ्या ग्रंथालयाची उभारणी भगवानदास रायकवार– बुंदेली वॉर आर्टचे प्रशिक्षक म्हणून पारंपरिक युद्धकलेचे जतन व प्रसार बृजलाल भट्ट (जम्मू–काश्मीर)– समाजसेवा व योगशिक्षणाच्या क्षेत्रातील योगदानासाठी बुदरी ठाडी (छत्तीसगड)–नक्षलग्रस्त भागात शिक्षण पोहोचवण्याच्या कार्यासाठी. चरण हेम्ब्राम (ओडिशा)– संथाली भाषेतील साहित्यनिर्मितीसाठी प्रसिद्ध लेखक. चिरंजी लाल यादव (उत्तर प्रदेश)– पितळकलेत (ब्रास आर्ट) लोकांना प्रशिक्षण देऊन पारंपरिक हस्तकलेचा विकास धार्मिक लाल चुन्नीलाल पांड्या– शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातील योगदानासाठी डॉ. कुमारस्वामी थंगराज–जेनेटिक्स (आनुवंशिक संशोधन) क्षेत्रातील महत्त्वपूर्ण संशोधनासाठी डॉ. पद्मा गुरमीत (लडाख)– सोवा–रिग्पा या पारंपरिक वैद्यक पद्धतीच्या संवर्धनासाठी

कोण आहेत तमाशा कलाकार रघुवीर खेडकर ?

(पान ३ वर)

## जाणून घ्या कशी असेल ७७ व्या प्रजासत्ताक दिनाची परेड

नवी दिल्ली : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार २६ जानेवारी २०२६ रोजी राजधानी नवी दिल्लीत कर्तव्य पथावर परेड अर्थात संचलन होणार आहे. या परेडच्या माध्यमातून देशाचे सामर्थ्य, समृद्ध सांस्कृतिक वारसा, प्रगती, लष्करी पराक्रम यांचे प्रतिबिंब दिसेल.




यंदाच्या परेडमध्ये भैरव लाईट कमांडो बटालियनचे पदार्पण होणार आहे. परेडमध्ये रिमाउंट अँड व्हेटर्नरी कॉर्प्सने प्रशिक्षित केलेली प्राण्यांची तुकडी दिसेल. ऑपरेशन सिंदूर आणि भारताच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याची झलक दिसेल. 'स्वातंत्र्याचा मंत्र : वंदे मातरम् आणि समृद्धीचा मंत्र : आत्मनिर्भर भारत ' या संकल्पनेअंतर्गत कर्तव्य पथावर ३० चित्ररथ आणि अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे. आसामची टेराकोटा कला, मणिपूरची कृषी प्रगती आणि हिमाचल प्रदेशची देवभूमी म्हणून असलेली ओळख यासह राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून १७ चित्ररथांचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होईल. तसेच केंद्र सरकारच्या अखत्यारितील विविध विभागांशी संबंधित अशा १३ चित्ररथांचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होईल. बंकिमचंद्र चटर्जींची रचना असलेले भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' ला दिडशे वर्ष झाल्याच्या निमित्ताने केंद्र सरकारचे सांस्कृतिक मंत्रालय विशेष चित्ररथ घेऊन परेडमध्ये सहभागी होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कार्यक्रमाची पाहणी करतील.

चित्ररथांच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे, सांस्कृतिक विविधतेचे आणि विविध क्षेत्रांमधील स्वावलंबनाकडे होणाऱ्या प्रगतीचे दृश्य वर्णन सादर केले जाईल. या चित्ररथात भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा वारसा, सांस्कृतिक विविधता आणि समकालीन कामगिरीचे मिश्रण सादर केले जाईल, ज्यामध्ये हस्तकला आणि लोक परंपरांपासून ते स्वावलंबन, नवोन्मेष, संरक्षण तयारी आणि राष्ट्र उभारणी उपक्रमांपर्यंतच्या विषयांचा समावेश असेल.

परेडमध्ये सैनिकांच्या तुकड्या सहभागी होतील. लष्करी बँड पथके आकर्षक धून वाजवत परेडमध्ये सहभागी होतील. तसेच परेडमधून ऑपरेशन सिंदूर आणि भारताच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याची झलक दिसेल. सैन्याच्या तिन्ही दलांमधील समन्वय दाखवला जाईल.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला , राष्ट्रपती मुर्मू रविवार, २५ जानेवारी रोजी राष्ट्राला संबोधित करतील. हे भाषण देशभरातील संपूर्ण आकाशवाणी नेटवर्कवर संध्याकाळी (पान ३ वर)

## इंडिगोचे ७१७ फेऱ्या रद्द

नवी दिल्ली : डिसेंबरच्या सुरुवातीला झालेल्या मोठ्या उड्डाण गोंधळानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) इंडिगो एअरलाईनवर कारवाई केली आहे. प्रवाशांच्या मोठ्या गैरसोयीची दखल घेत डीजीसीएने इंडिगोचे हिवाळी वेळापत्रक १० टक्क्यांनी कमी करण्याचे आदेश दिले असून, त्यामुळे एअरलाईनला काही सेवा रद्द कराव्या लागल्या आहेत. या निर्णयानुसार इंडिगोने मंत्रालयाकडे ७१७ रिकाम्या




स्लॉटची यादी सादर केली आहे.

मागील वर्षी ३ ते ५ डिसेंबरदरम्यान इंडिगोची अंदाजे अडीच हजारांहून अधिक उड्डाणे रद्द झाली होती, तर जवळपास दोन हजार उड्डाणांना विलंब झाला होता. यामुळे देशभरातील लाखो प्रवाशांना विमानतळांवर तासंतास वाट पाहावी लागली आणि मोठा मनस्ताप सहन करावा लागला होता. या गंभीर व्यत्ययाच्या पार्श्वभूमीवर डीजीसीएने ही कठोर कारवाई केली.

स्लॉट म्हणजे विमानाला विमानतळावर उतरण्यासाठी आणि उड्डाणासाठी दिलेला निश्चित वेळ असतो. इंडिगोने रिकामे केलेल्या ७१७ स्लॉटपैकी ३६४ स्लॉट दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बंगळूरु आणि हैदराबाद (पान ३ वर)

## राज्यातून थंडी गायब?

मुंबई : प्रतिनिधी– राज्यात मकर संक्रांतीनंतर थंडी कमी झालेली पाहायला मिळते आहे. किमान तापमानात सतत होणा–या चढ –उतारामुळे वातावरणातील गारठा काहीसा कमी झाला आहे. ठिकठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळत असून काही जिल्ह्यांमध्ये पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली. २५ जानेवारी रोजी ढगाळ हवामानासह किमान तापमानात वाढ कायम राहण्याची शक्यता हवामान (पान ३ वर)

## प्रवाशांच्या सुरक्षेसाठी यंत्रमानव 'एएससी अर्जुन' तैनात

विशाखापट्टणम : सध्याचे जग कृत्रिम बुद्धिमत्ता व रोबोटिक्सचे आहे. आपली बहुतांशी कामे मानव आता यंत्रमानवाकडून करून घेऊ लागला आहे. रेल्वे स्थानकावरील गर्दीचे व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सामानाची सुरक्षा करण्यासाठी भारतीय रेल्वेनेही आपल्या कामात यंत्रमानवाचा वापर करायला सुरुवात केली आहे. विशाखापट्टणम रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मानवरूपी यंत्रमानव 'एएससी अर्जुन' तैनात केला आहे.



भारतीय रेल्वेच्या पूर्व किनारपट्टी भागात प्रवासी सुरक्षा, संरक्षण आणि सेवा वितरण अधिक सक्षम करण्यासाठी 'एएससी अर्जुन' हा मानवरूपी (ह्युमनॉइड) यंत्रमानव कार्यान्वित करण्यात आला आहे. रेल्वे सुरक्षा बलाच्या (आरपीएफ) अधिपत्याखाली हा यंत्रमानव तैनात करण्यात आला आहे. आधुनिकीकरण आणि डिजिटल परिवर्तन मोहिमेचा तो एक भाग आहे. यामागील उद्देश सुरक्षा यंत्रणा बळकट करणे आणि प्रवाशांना अधिक प्रभावी सहाय्य देणे हा आहे.

'प्रवासी सुरक्षा, संरक्षण आणि सेवा अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने विशाखापट्टणम रेल्वे स्थानकावर हा मानवरूपी रोबोट तैनात करून मोठे पाऊल उचलण्यात आले आहे,' असे 'आरपीएफ'चे महानिरीक्षक आलोक बोहरा यांनी सांगितले. विभागीय रेल्वे व्यवस्थापक ललित बोहरा यांनी सांगितले की, हा यंत्रमानव प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ताने सुसज्ज आहे. त्यामुळे तो 'आरपीएफ' (पान ३ वर)

## भाजपने केवळ घोषणांचा पाऊस पाडला, ग्रामीण विकासाच्या बाबतीत मात्र काम शून्य – माजी आमदार धिरज देशमुख



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर :-- सध्याच्या भाजप सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थकारण पूर्णतः कोलमडले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची आश्वासने देणाऱ्यांनी प्रत्यक्षात बळीराजाला हतबल आणि कर्जबाजारी केले आहे. भाजपने केवळ घोषणांचा पाऊस पाडला, पण विकासाच्या बाबतीत त्यांचे काम शून्य आहे, अशा शब्दांत माजी आमदार धिरज देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली.

लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने प्रचारार्थ ममदापूर,बामणी, चिकलठाणा, भाडगाव , मुरूड अंकोली,टाकळी शि.सावरगाव शिऊर येथे आयोजित कॉर्नर सभा व बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर काँग्रेसचे विविध पदाधिकारी आणि स्थानिक नेते उपस्थित होते. धिरज विलासराव देशमुख पुढे म्हणाले की, ही निवडणूक केवळ स्थानिक प्रतिनिधी निवडण्यासाठी नाही, तर ग्रामीण भागाच्या भविष्याची दिशा ठरवणारी आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला आणि युवक आज भाजपच्या फसव्या धोरणांमुळे प्रचंड अडचणीत आहेत. याउलट काँग्रेस पक्षाने नेहमीच कष्टकरी जनतेच्या पाठीशी उभे राहून विकासाची पायाभरणी केली आहे.

या सभेतील ठळक मुद्दे: शेतकरी प्रश्नांवर सरकारचे अपयश: आश्वासन देऊनही शेतीमालाला हमीभाव न मिळाल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. युवकांचे (पान ३ वर)

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवाची गौरवशाली परंपरा वृंध्दिगत करावी

### पूर्वतयारी आढावा बैठकीत ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांचे आवाहन

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर/प्रतिनिधी : ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून हा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात येत असून या वर्षी महोत्सवाचे ७३ वे वर्ष आहे. गत ७२ वर्षापासून सुरु असलेल्या या महोत्सवाला गौरवशाली परंपरा असून ही परंपरा अधिकाधिक वृंध्दिगत करावी, असे आवाहन देवस्थान समितीचे ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. यावेळी ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे बोलत होते. या प्रसंगी विश्वस्त अशोक भोसले, रमेश बिसेन, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, व्यंकटेश हालिंगे यांच्यासह प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर परजिल्ह्यासह कर्नाटक राज्यात श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सव पोहोचला असल्याचे



सांगून या यात्रा महोत्सवाला हजारो भाविकांसह नागरीकांचा मोठा सहभाग नोंदवला जात असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी स्पष्ट केले. ७२ वर्षापासून सदर यात्रा महोत्सव भरविण्यात येत असून यात्रा महोत्सवाला यशस्वी करण्यासाठी लातूरसह परिसरातील अनेक शिवभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते आपले योगदान देतात. त्याच बरोबर विश्वस्तही तितक्याच ताकदीने या सर्वांच्या पाठिशी उभे राहून यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ताकद देत असतात.

या महोत्सवाला सिध्देश्वर महाराजांच्या आशिर्वादाने व सर्वांच्या सहकार्याने गौरवशाली परंपरा लाभलेली असून ही परंपरा वृंध्दीगत करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी सांगितले.

(पान ३ वर)

## औद्योगिक भेटीतून विद्यार्थ्यांना साखर उत्पादन प्रक्रियेचे प्रत्यक्ष ज्ञान

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा एकदिवसीय औद्योगिक अभ्यास दौरा यशस्वी



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर यांच्या वतीने विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., चिंचोलीराव (ता. व जि. लातूर) येथे एकदिवसीय औद्योगिक अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. हा दौरा बँकिंग अँड इन्शुरन्स समिती व फॉरेन ट्रेड समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला.

या औद्योगिक अभ्यास दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांना साखर उत्पादनाची संपूर्ण प्रक्रिया, अत्याधुनिक यंत्रसामग्री तसेच साखर उद्योगाशी संबंधित इथेनॉल, मळी यांसारख्या सहउत्पादनांची निर्मिती प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची व समजून घेण्याची संधी मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांचे औद्योगिक व व्यावहारिक ज्ञान अधिक समृद्ध झाले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यास दौरा संपन्न झाला. या दौऱ्यास डॉ. निखिल व्यास, डॉ. रूपा गिल्डा, डॉ. लता जाधव, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालय प्रशासन व समिती सदस्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

#### दिलीपराव देशमुख यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

या औद्योगिक भेटीदरम्यान साखर कारखान्याचे चेअरमन व माजी राज्यमंत्री दिलीपराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या साखर उत्पादनासंदर्भातील ज्ञानाबाबत त्यांनी माहिती घेतली तसेच मांजरा परिवारातील सर्व कारखान्यांमध्ये विद्यार्थ्यांचे नेहमीच स्वागत राहील, असे प्रतिपादन केले. त्यांच्या प्रेरणादायी संवादामुळे विद्यार्थी विशेषतः भारावून गेले.

## शेतकऱ्यांच्या हितासाठी 'जय जवान जय किसान' कारखाना सुरू करण्यासाठी पुढाकार घेणार :आमदार देशमुख



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर प्रतिनिधी:– नळेगाव आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या हितासाठी जय जवान जय किसान साखर कारखाना सुरू करण्यासाठी आपण पुढाकार घेऊ त्यासोबतच, या परिसरातील नवउद्योजकांना उद्योग उभारणीसाठी त्याचबरोबर तरुणांच्या हाताला काम मिळावे म्हणून औद्योगिक वसाहत उभारण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिले आहे

रविवार दि. २५ जानेवारी रोजी नळेगाव येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेस महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवराव खांडेकर गुरुजी होते तर माजी मंत्री विनायकराव पाटील, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा काँग्रेस व महाविकास आघाडीचे जानवळ जिल्हा परिषद गटाचे उमेदवार एन.आर पाटील, अहमदपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चंद्रकांत मद्दे, चाकूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धनंजय कोरे, व्हा.चेअरमन विजय देशमुख, विलास को. ऑप.बँकेचे व्हा.चेअरमन समद पटेल आदीसह यावेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते तसेच नळेगाव जिल्हा परिषद गटासह सुगाव व नळेगाव पंचायत समिती गणातील मतदार बंधू भगिनी,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान ३ वर)

# हे किळसवाणे कोठून येते?

विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. बेकायदेशीर शाळेच्या महिला सहाय्यक नसलेल्या व्हॅनमध्ये एका चिमुकलीचा विनयभंग झाला.

साधारण दीड वर्षांत घडलेल्या दुसऱ्या विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. या प्रकराची माहिती बातम्यांमध्ये काल आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता पसरली. बदलापूरमध्ये साधारण वर्ष - सव्वा वर्षापूर्वी शाळकरी मुलीच्या विनयभंगाचा दुर्दैवी प्रकार घडला होता. शाळेतल्या शिपायाकडूनच विनयभंगाचा प्रकार झाल्याने आणि शाळा प्रतिष्ठित, ख्यातनाम असल्याने पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास हयगय चालवली, तेव्हां बदलापूरकरांनी मोठ्या संख्येने रेल्वे रुळावर उतरून आपल्या भावनांना वाट करून दिली होती. त्या उद्रेकाने सगळ्या यंत्रणा वठणीवर आल्या होत्या. त्या विनयभंग प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेनंतर पोलिसांच्या गाडीत झालेल्या चकमकीत मारला गेला. त्या संपूर्ण प्रकरणाची आठवण महाराष्ट्राला काल पुन्हा एकदा झाली. गेल्या प्रकरणात शाळकरी मुलगी होती. यावेळी पूर्वप्राथमिक शाळेत, म्हणजे बालवाडीत जाणारी अवघी चार वर्षांची चिमुकली आहे. गेल्यावेळी शाळेतला शिपाई होता; यावेळी मुलांची शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी व्हॅनचा चालक आहे. म्हणजे, ज्यांची व्यवस्था मुलांच्या सहाय्यासाठी आणि संरक्षणासाठी केली आहे, तेच दोन्ही प्रकरणात आरोपी आहेत! अशावेळी विश्वास कोणावर ठेवायचा, असा प्रश्न हतबल पालकांसमोर उभा ठाकल्याशिवाय राहात नाही. दोन्ही घटना बदलापुरात घडल्याने हा प्रश्न केवळ बदलापूरपुरता सीमित आहे, असा गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. याची व्याप्ती पूर्ण देशभर आहे. महाराष्ट्राने; निदान महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांनी आणि पोलीस महासंचालकांनी तरी याची गंभीर दखल घेतली पाहिजे. अशा घटना घडू नयेत यासाठी कडक प्रतिबंधात्मक व्यवस्था केली पाहिजे. महाराष्ट्रातल्या महानगरी, शहरी, निमशहरी, ग्रामीण-अशा सर्व ठिकाणी समान पद्धतीने लागू करता येईल, अशीच ही उपाययोजना असायला हवी. बदलापूरला आता महिला नगराध्यक्ष असल्याने त्यांनी स्थानिक पातळीवर या प्रश्नाच्या खोलात जाऊन संबंधित यंत्रणांना उपाययोजनांसाठी मदतही केली पाहिजे. कारण, या शहराची इभ्रत राखण्याची सगळ्यात पहिली जबाबदारी त्यांची आहे!

बदलापुरात अगदी कमी अंतराने दोन घटना घडल्या आणि पहिल्या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला गहाळपणा केला, अन्यथा बदलापूरचं नांव एवढं चर्चेत येण्याचं काही कारण नव्हतं. अशाच घटना यापूर्वी मुंबईत, उच्चभ्रूंच्या मानल्या जाणाऱ्या शाळेतही घडल्या आहेत. त्या प्रकारानंतर शाळेच्या बस आणि शाळेने नेमलेल्या खासगी कंत्राटदारांच्या बस याबाबत बरीच चर्चा झाली होती. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या अशा बसमध्ये एक महिला सहाय्यक असावी, मुलांना बसमध्ये घेण्याची आणि शाळा सुटल्यानंतर त्यांना बसमधून पुन्हा पालकांच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी या महिला सहाय्यकावर सोपवावी, असा तोडगा निघाला होता. त्याची अंमलबजावणीही झाली होती. मुंबईत घडलेल्या त्या घटनेचे पडसाद इतके तीव्र होते, की बसच काय; मुलांची शाळेसाठी वाहतूक करणाऱ्या व्हॅनमध्येही महिला सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली होती. पण, नंतर आपल्याकडे जे घडतं, तेच झालं. काळ लोटला. प्रकरणाचं गांभीर्य कमी झालं. नवं शालेय वर्ष सुरू झालं. व्हॅनमधल्या महिला सहाय्यक गायब झाल्या आणि परवाचा प्रकार घडला! या बालिकांच्याबाबतच नाही, जगात कुठेही महिलांच्या विनयभंगाचे प्रकार घडले, अत्याचाराच्या घटना घडल्या, तर त्यातल्या बहुतांश घटनांमध्ये पुरुष नातेवाईक किंवा परिचितांपैकीच कोणीतरी आरोपी असतात, अशी सिद्ध झालेली आकडेवारी आहे. बदलापूरच्या पूर्वीच्या घटनेतला आरोपी शाळेचा शिपाई होता. परवा घडलेल्या आणि मुंबईतल्याही अलीकडच्या घटनेतले आरोपी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी असलेल्या गाड्यांचे चालक होते. परवाच्या घटनेच्या तपशिलात पाहिलं, तर व्हॅन नेहमी बालिकेला घेऊन ज्या वेळेला येते, त्यापेक्षा बराच उशीर झाल्याने पालकांनी चौकशी केली, तेव्हा त्यानंतर पाऊण तासाने व्हॅन पोहोचली. परतलेल्या बालिकेचं वर्तन पालकांना खटकल्याने त्यांनी जेव्हा खोदून खोदून चौकशी केली, तेव्हा आक्षेपार्ह प्रकार उघडकीस आला. चालकाला शाळेत बोलावलं, तेव्हा बालिका घाबरून पालकांमागे लपली. झाल्या प्रकाराला त्यातून दुजोरा मिळाला, असं समजतं. हा संपूर्ण प्रकारच अत्यंत किळसवाणा आहे.

इतक्या छोट्या मुलींचा विनयभंग होईल, असं दुष्कृत्य करावंसं संबंधित पुरुषांना का वाटत असेल? त्यांच्या मनात असं अभद्र कशातून उगवत असेल? शिक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ या प्रकारांसाठी पहिले दोषी ठरवतात, ते मोबाईलमधून २४ तास स्रवत असलेल्या हिंसक, लैंगिक, भावना उद्दीपित करणाऱ्या 'मनोरंजना'च्या तथाकथित कार्यक्रमांना. या कार्यक्रमांतून; छोट्या छोट्या रीलमधूनही जे पोहोचतं, त्यातून अशा आक्षेपार्ह बाबींबाबतचं गांभीर्य, धाक संपून जातो. नैतिकतेचे सारे संस्कार गळून पडतात. असा एखादा कार्यक्रम किंवा रील पाहिल्या, तरी तुमच्या मोबाईलवर त्याच प्रकारचे कार्यक्रम, रील किंवा मनोरंजनाच्या तत्सम प्रकारांची रांग लागते. पाहणारा एकामागून एकात गुंतत जातो. त्यातून सगळं जग अशा विकृत प्रकारांनीच भरलं असल्याचा भास त्याला होतो. जे 'खासकरून' बनवलेलं असतं, तेच त्याला 'सर्वसाधारण' वाटू लागतं. त्यातून हे प्रकार वाढीस लागतात. साहजिकच प्रौढांपेक्षा तरुणांमध्ये, कुटुंबापासून लांब असलेल्या किंवा निवासाच्या अपुऱ्या सोयी असलेल्यांमध्ये हे प्रकार अधिक आहेत. बदलापूरमध्ये घडलेल्या दुर्घटना उघडकीस आल्या, त्याची दखल पालकांनी घेतली, प्रकरण पोलिसांपर्यंत नेण्याचा आग्रह धरला म्हणून; अन्यथा मुंबई आणि मुंबईलगत पसरलेल्या अक्राळविक्राळ वस्त्यांचा नुसता अंदाज घेतला, तरी त्यात असे असंख्य प्रकार आढळतील. अगदी लहान मुलांमध्ये (केवळ मुलींनानव्हे!), शाळेच्या शिक्षकवृंदासह सर्व कर्मचाऱ्यांमध्ये, सहाय्यक ज्या स्तरातून येतात, त्या स्तरांमध्ये आणि महत्त्वाचं म्हणजे, पोलिसांमध्ये मुली-महिलांवरील अशा विनयभंग, जोर-जबरदस्तीच्या प्रकरणांबाबतची संवेदनशीलता वाढवली पाहिजे. अशी संवेदनशीलता वाढवणं, ही जागृतीनंतरची पुढची पायरी आहे. समाजमाध्यमांतून वाहत असलेल्या, अतिरंजित, विकृत 'मनोरंजना'चं काय करायचं, हा जगातल्या सगळ्याच सरकार आणि समाजधुरिणांसमोरचा प्रश्न आहे. हा 'जागतिक प्रश्न' जेवढ्या लवकर सुटेल, तेवढे पुनःपुन्हा 'बदलापूर' होण्यापासून वाचेल!

# भारतीय संविधान, सद्यस्थिती आणि आपण : ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आत्मपरीक्षण

२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत गौरवशाली, अर्थपूर्ण आणि आत्मपरीक्षणाची संधी देणारा दिवस आहे. १९५० साली याच दिवशी भारतीय संविधान अंमलात आले आणि भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून औपचारिकरीत्या अस्तित्वात आला. ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण केवळ ध्वजारोहण, संचलन, भाषणे आणि औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता संविधानाचा आत्मा, आजची सामाजिकराजकीयआर्थिक सद्यस्थिती आणि या सगळ्या प्रक्रियेत ङ्गआपणफ म्हणजे सामान्य नागरिक म्हणून आपली भूमिका व जबाबदारी यांचा सखोल विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रजासत्ताक दिन हा उत्सवाइतकाऐच तो अंतर्मुख होण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि नव्या संकल्पांची बांधिलकी स्वीकारण्याचा दिवस आहे.

भारतीय संविधानाचा जन्म हा अचानक घडलेला ऐतिहासिक योगायोग नव्हता. त्यामागे शेकडो वर्षांचा सामाजिक अन्याय, आर्थिक शोषण, जातीय विषमता, स्त्रीपुरुष असमानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या लढ्याचा दीर्घ इतिहास दडलेला आहे. ब्रिटिश राजवटीखाली भारत केवळ राजकीयदृष्ट्या गुलाम नव्हता, तर सामाजिकदृष्ट्याही तो अंतर्गत विसंगतींनी, रूढीपरंपरांच्या जोखडाने आणि दारिद्र्याने ग्रासलेला होता. स्वातंत्र्यलढा हा केवळ सत्ता हस्तांतराचा संघर्ष नव्हता, तर तो माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवण्याचा व्यापक लढा होता. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा आणि नैतिकतेच्या बळावर या लढ्याला दिशा दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेला संविधानिक अधिष्ठान दिले.

संविधान सभेने जवळपास तीन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस चाललेल्या सखोल चर्चांमधून भारतीय संविधानाची निर्मिती केली. जगातील विविध लोकशाही देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून, भारतीय समाजाच्या बहुविध वास्तवाचा विचार करून हे संविधान घडवण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने तयार केलेले संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून भारतीय समाजाच्या आशाआकांक्षा, संघर्ष, वेदना आणि स्वप्नांचा जिवंत दस्तऐवज आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संविधानाची चार मूलभूत मूल्ये आजही भारतीय प्रजासत्ताकाचा आत्मा आणि दिशा ठरवणारी शक्ती आहेत.

प्रजासत्ताक ही संकल्पना केवळ राष्ट्रप्रमुख निवडणुकीद्वारे निवडला जातो इतक्यापुरती मर्यादित नाही. प्रजासत्ताक म्हणजे सत्ता एखाद्या व्यक्तीकडे किंवा राजघराण्याकडे न राहता लोकांकडे असणे, कायद्यापुढे सर्व समान असणे आणि निर्णयप्रक्रियेत जनतेचा सक्रिय सहभाग असणे. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देऊन प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिला. शिक्षण, संपत्ती, जात, धर्म किंवा लिंग यांचा विचार न करता मतदानाचा हक्क देणे ही लोकशाहीच्या इतिहासातील क्रांतिकारी पायाभरणी होती. मात्र लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सजग, चिकित्सक आणि जबाबदार नागरिकत्वात रूपांतरित होणे आवश्यक आहे.



संविधानाने दिलेले मूलभूत हक्क हे भारतीय नागरिकांचे संरक्षणकवच आहेत. समानतेचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क आणि घटनात्मक उपायांचा हक्क हे अधिकार नागरिकांना सन्मानाने जगण्याची हमी देतात. परंतु आजच्या सद्यस्थितीत या हक्कांचा वापर करताना अनेकदा त्यांचा गैरवापर, संकुचित अर्थ लावणे किंवा राजकीय हेतूसाठी विकृतीकरण होत असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून विवेकाने व्यक्त होण्याची क्षमता होय, हे आपण पुन्हापुन्हा लक्षात घेतले पाहिजे.

आजची आर्थिक आणि सामाजिक सद्यस्थिती पाहिली असता भारत प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे जात असतानाच अनेक अंतर्विरोधांना सामोरे जात आहे. पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढती भूमिका यांमुळे भारताची आंतरराष्ट्रीय ओळख अधिक ठळक होत आहे. मात्र या प्रगतीसोबत आर्थिक विषमता वाढताना दिसते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावत चालली असून मध्यमवर्गीयांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. बेरोजगारी, महागाई, शेतकरी संकट, असंघटित कामगारांचे प्रश्न हे आजही गंभीर स्वरूप धारण करून समाजासमोर उभे आहेत.

ग्रामीण आणि शहरी भारतातील असमतोल विकास ही आजची मोठी समस्या आहे. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो, तर शहरी भागात स्पर्धा, असुरक्षितता, ताणतणाव आणि सामाजिक दुरावा वाढताना दिसतो. स्थलांतरामुळे झोपडपट्ट्यांची वाढ, पर्यावरणीय ताण आणि सामाजिक विस्कळीतपणा निर्माण होत आहे. संविधानाने सामाजिक आणि आर्थिक न्यायाची हमी दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक मर्यादा आणि अडथळे दिसून येतात.

सामाजिक पातळीवर जातीय तणाव, धार्मिक ध्रुवीकरण, असहिष्णुता आणि द्वेषमूलक प्रवृत्ती वाढताना दिसतात. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेची हमी दिली असली तरी सामाजिक वास्तवात अजूनही भेदभाव, अन्याय आणि शोषण पूर्णपणे संपलेले नाही. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांना अजूनही हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक असमानता या समस्या प्रजासत्ताकाच्या आरोग्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

राजकीय सद्यस्थितीचा विचार करता लोकशाही प्रक्रियेत झालेले बदल प्रकर्षाने जाणवतात. निवडणुका नियमितपणे होत असल्या तरी राजकारणात पैसा, प्रचारयंत्रणा, सोशल मीडिया आणि भावनिक मुद्द्यांचे वाढते वर्चस्व चिंताजनक ठरत आहे. संसदीय चर्चा, धोरणात्मक पारदर्शकता आणि लोकप्रतिनिधींचे उत्तरदायित्व या बाबी दुर्लक्षित होत असल्याची भावना निर्माण होते. लोकशाही केवळ सत्तांतराची प्रक्रिया नसून ती सतत जागरूक राहण्याची, प्रश्न विचारण्याची आणि संवाद साधण्याची व्यवस्था आहे, हे आपण विसरता कामा नये.

शिक्षण व्यवस्था ही संविधान आणि सद्यस्थिती यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. सुशिक्षित, विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक घडवणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे. मात्र आज शिक्षण अधिकाधिक बाजाराभिमुख, स्पर्धात्मक आणि गुणकेंद्रित होत चालले आहे. संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी, नैतिकता आणि मानवी संवेदना यांचे शिक्षण दुय्यम ठरत आहे. युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव, संविधानाची ओळख आणि सामाजिक जबाबदारी रुजवणे ही काळाची गरज आहे.

स्त्री सक्षमीकरणाचा प्रश्न हा संविधान आणि सद्यस्थिती यांतील अंतर स्पष्टपणे अधोरेखित करतो. संविधानाने स्त्रीपुरुष समानतेची हमी दिली असली तरी प्रत्यक्षात स्त्रियांना सुरक्षितता, समान संधी आणि सन्मान मिळवण्यासाठी अजूनही संघर्ष करावा लागतो. शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकारण आणि निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढत असला तरी सामाजिक मानसिकता बदलणे ही खरी गरज आहे. स्त्री सक्षमीकरण हा केवळ महिलांचा प्रश्न नसून तो संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला विषय आहे.

आदिवासी, भटक्याविमुक्त जमाती आणि इतर वंचित घटकांच्या प्रश्नांकडे पाहिले असता विकासाच्या मुख्य प्रवाहात ते अनेकदा मागे पडलेले दिसतात. जमिनीचे हक्क, जंगलावरचा अधिकार, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी याबाबत अजूनही मोठी दरी आहे. संविधानाने दिलेल्या संरक्षणात्मक तरतुदी प्रत्यक्षात कितपत प्रभावीपणे राबवल्या जात आहेत, हा गंभीर आत्मपरीक्षणाचा प्रश्न आहे. समतामूलक समाजनिर्मितीसाठी या घटकांचा विकास केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे.

डिजिटल युगातील भारत ही आजची एक महत्त्वाची सद्यस्थिती आहे. तंत्रज्ञानामुळे शासन अधिक पारदर्शक झाले, सेवा सुलभ झाल्या आणि माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. मात्र त्याचवेळी खोटी माहिती, अफवा, द्वेषमूलक भाषण, ट्रोल संस्कृती आणि सामाजिक माध्यमांवरील ध्रुवीकरण यांचा धोका वाढला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखणे हे आजच्या लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे. सजग डिजिटल नागरिकत्व ही आजच्या प्रजासत्ताकाची नवी गरज बनली आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर ङ्गआपणफ म्हणजे सामान्य नागरिकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. संविधान हे केवळ सरकार किंवा न्यायालयांसाठी नसून ते प्रत्येक नागरिकासाठी आहे. मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. अनेकदा आपण समस्या फक्त सरकारकडे ढकलतो, पण नागरिक म्हणून आपली भूमिका, कर्तव्ये आणि सहभाग याकडे दुर्लक्ष करतो.

लोकशाही टिकवायची असेल तर नागरिकांनी प्रश्न विचारणे, माहिती घेणे, विवेकपूर्ण चर्चा करणे आणि सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. निष्क्रिय नागरिकत्व हे लोकशाहीसाठी घातक ठरते. सामाजिक सलोखा, सहिष्णुता, संवाद आणि बंधुता या मूल्यांची जोपासना आपल्या रोजच्या आचरणातून झाली तरच संविधान जिवंत राहील. मतभेद असू शकतात, पण ते द्वेषात किंवा हिंसेत रूपांतरित होऊ नयेत, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

जागतिक पातळीवर भारताची भूमिका वाढत असताना संविधानिक मूल्यांचा आधार घेणे अत्यंत गरजेचे आहे. शांतता, सहअस्तित्व आणि मानवतावादी दृष्टिकोन ही भारताची ओळख राहिली आहे. ङ्गवसुधैव कुटुंबकम्फ ही भारतीय संस्कृतीतील संकल्पना आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत अधिकच सुसंगत ठरते. आपण जर आपल्या मूल्यांशी प्रामाणिक राहिलो तर, भारताचा प्रजासत्ताक अनुभव जगासाठी मार्गदर्शक ठरू शकतो.

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने संविधान, सद्यस्थिती आणि आपण यांचा एकत्रित विचार करताना हे स्पष्ट होते की संविधानाने आपल्याला दिशा दिली आहे, सद्यस्थिती आपल्याला प्रश्न विचारायला भाग पाडते आणि ङ्गआपणफ या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची, बदल घडवण्याची आणि लोकशाही मजबूत करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. संविधान जिवंत ठेवायचे असेल तर ते केवळ ग्रंथालयात किंवा कायद्याच्या पुस्तकात नव्हे, तर आपल्या विचारात, वर्तनात आणि कृतीत उतरवावे लागेल.

शेवटी असे म्हणता येईल की भारतीय प्रजासत्ताक हे केवळ एक राजकीय व्यवस्था नसून ते एक व्यापक सामाजिक करार आहे. हा करार टिकवण्याची जबाबदारी सरकारइतकीच नागरिकांचीही आहे. संविधानाचे मूल्य, आजचे वास्तव आणि उद्याचे स्वप्न यांचा समतोल साधत जर आपण पुढे गेलो, तरच भारत खऱ्या अर्थाने समतामूलक, सशक्त, लोकशाहीवादी आणि मानवतावादी राष्ट्र बनेल. २६ जानेवारी हा दिवस आपल्याला हीच जाणीव करून देतो की प्रजासत्ताक हा केवळ साजरा करण्याचा नव्हे, तर रोज जगण्याचा, जपण्याचा आणि पुढील पिढ्यांसाठी अधिक मजबूत करण्याचा संकल्प आहे.

– डॉ. राजेंद्र बगाटे

# नाटक हे अभिनयाचे मूळ माध्यम नाटककार कोथळीकर

मुरुम (प्रतिनिधी)- चित्रपट, साहित्य, नाटक आणि कथा लेखन ही क्षेत्रे केवळ छंद नसून करिअरची मोठी दारे उघडणारी आहेत. मेहनत, कौशल्य आणि योग्य मार्गदर्शन असेल तर विद्यार्थ्यांना या क्षेत्रात नक्कीच उज्वल भविष्य घडवता येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना योग्य वेळी वाव दिली पाहिजे. प्रत्येकाला जीवनात संधी मिळत असते, या संधीचे सोने करता आले पाहिजे. नाटक हे अभिनयाचे मूळ माध्यम असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार संजय कोथळीकर यांनी केले. दरम्यान, स्वयंशासन दिनाचा अनुभव म्हणजे स्वतः च्या कारभाराची पहिली पायरी असल्याची विद्यार्थ्यांना जाणीव झाली.




मुरूम येथील प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वयंशासन दिन व निरोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उल्हास घुरघुरे होते. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. संजय गिरी, मुरूम शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. स्वयंशासन दिनाचे कला शाखेच्या प्राचार्य प्रतीक्षा गावडे, वाणिज्य शाखेच्या रिया जाने, विज्ञान शाखेच्या वैष्णवी हिरमुखे, कला शाखेच्या उपप्राचार्य माही चव्हाण, वाणिज्य शाखेच्या सुजाता जोशी, विज्ञान शाखेच्या ज्ञानेश्वरी सुरवसे, पर्यवेक्षक रुपाली महामुनी, दिक्षा मुदकण्णा, श्रष्टी कट्टे, स्नेहल येवले आदी उपस्थित होते. प्रारंभी कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख अतिथी संजय कोथळीकर यांचा परिचय प्रा. विश्वजीत अंबर यांनी करून दिला. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी उल्हास घुरघुरे म्हणाले की, विद्यार्थ्यांना गुरुवर्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा कधीही विसर न पडता ते संस्कार, मूल्य घेऊन आयुष्यभर जगून स्वतःचे व महाविद्यालयाचे नाव रोशन केले पाहिजे. प्रा. सतिश रामपुरे, प्रा. अजित सूर्यवंशी, प्रा. अमोल गायकवाड, प्रा. बिभीषण बंडगर, प्रा. दिपक सांगळे, प्रा. रत्नदीप वाकडे, प्रा. नारायण सोलंकर, प्रा. दयानंद राठोड, प्रा. रेखा उण्णद, प्रा. सरस्वती तपसाळे, प्रा. माधुरी नरगिडे, प्रा. साक्षी महामुनी आदींनी पुढाकार घेतला. स्वयंशासनदिनी विद्यार्थ्यांनी शिक्षक व मुख्याध्यापकांच्या जबाबदाऱ्या सांभाळून शालेय कामकाज यशस्वीरीत्या पार पाडले. विद्यार्थ्यांनी वर्गनियंत्रण, प्रार्थनासभा, उपस्थिती व शिस्त राखण्याची जबाबदारी घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उमाकांत महामुनी यांनी तर सूत्रसंचालन साक्षी गोटगे यांनी व आभार सायली कांबळे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव नगर परिषदेच्या विषय समिती सभापतींच्या निवडी बिनविरोध



धाराशिव (प्रतिनिधी) - धाराशिव नगर परिषदेच्या स्थायी समिती व विविध विषय समितींच्या सभापती पदांच्या निवडी दि.२४ डिसेंबर रोजी बिनविरोध पार पडल्या. दरम्यान, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापतींचा सत्कार करण्यात आला.

या निवडीत स्थायी समिती अध्यक्षपदी नगराध्यक्षा नेहा काकडे, आरोग्य व स्वच्छता समिती सभापतीपदी उपनगराध्यक्ष अक्षय ढोबळे, सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी अभिजित काकडे, नियोजन व विकास समिती अध्यक्षपदी आकाश तावडे, पाणी पुरवठा व जलनि:सारण समिती अध्यक्षपदी विलास लोंढे, क्रीडा, शिक्षण व सांस्कृतिक समिती अध्यक्षपदी प्रवीण माळी, महिला व बाल कल्याण समिती सभापतीपदी वैशालीताई सुशांत सोनवणे तर उपसभापतीपदी दिपाली धनंजय पाटील यांची निवड करण्यात आली. पिठासीन अधिकारी म्हणून तुळजापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी कामकाज पाहिले.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# पळसप गटातून जिल्हा परिषदेची निवडणूक लढणार आणि जिंकणार - लाकाळ

धाराशिव (प्रतिनिधी) - धाराशिव तालुक्यातील पळसप जिल्हा परिषद गटातून शिवसेना-भाजप महायुतीच्या माध्यमातून लढविण्यासाठी अजित लाकाळ यांनी मुंबई येथील नंदनवन या शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मी पळसप गटामधून निवडणूक लढणार असून तुमचे आशिर्वाद मिळायला पाहिजेत असे साकडे लाकाळ यांनी घातले. त्यावेळी पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी तू निवडणूक लढ, जिल्हा परिषदेच्या सभागृहात जा, माझा आशिर्वाद तुझ्या पाठीशी आहे, अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आशिर्वाद दिलेला आहे.

त्यामुळे मी जिल्हा परिषदची निवडणूक लढणार आणि जिंकणार असल्याचा आत्मविश्वास शिवसेना तालुकाप्रमुख अजित लाकाळ यांनी व्यक्त केला. खुद्द पक्षप्रमुखाचे आशिर्वाद असल्यामुळे मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ते कामाला लागले आहेत.



धाराशिव तालुक्यातील पळसप जिल्हा परिषद गटातून शिवसेना तालुकाप्रमुख अजित लाकाळ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांनी पळसप व परिसरातील गावामध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे केलेली आहेत. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करून त्याचा लाभ मिळवून दिलेला आहे. विशेष म्हणजे गावोगावी पेवर ब्लॉक बसविण्यासह या भागातील खास शेतकऱ्यांसाठी पोखरा योजना राबवावी यासाठी तत्कालीन पालकमंत्री तथा आमदार प्रा डॉ तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनापासून मंत्रालय स्तरावरपर्यंत यशस्वी पाठपुरावा करून गावांचा समावेश करून घेतला आहे. तसेच त्यांनी संजय गांधी, इंदिरा गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना या योजनांचा निराधार यांना लाभ मिळवून दिला आहे. तर शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यासह आरोग्याच्या सुविधा देखील दर्जेदार मिळाव्यात यासाठी तत्कालीन आरोग्य मंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारणे व म्बुलन्स करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. विशेष म्हणजे १९९२ पासून तेर मुरुड हा राज्यमार्ग पळसपमधून जाणारा आहे. मात्र, पळसपमधील अतिक्रमण काढल्यास कोणत्याही नेत्यांनी पुढाकार घेतला नाही. परंतू, लाकाळ यांनी तो प्रश्न मार्गी लावल्यामुळे गावातून गोळी सारखा असलेला रस्ता रुंद झाला आहे. त्यामुळे गावातील वाहनांची होणारी वाहतूक कोंडी संपली असून प्रवाशांना हा रस्ता सोयीचा झाला आहे. तसेच पळसप गावांतर्गत डांबरीकरणाचे रस्त्यांचे जाळे मजबूत केले आहे. तसेच विद्यमान पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे या मतदारसंघातील रस्ता व इतर कामे करण्यासाठी प्रस्ताव दिला असून ते लवकरच मार्गी लावणार आहेत. लाकाळ यांनी ही कामे ते पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद यापैकी कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसताना त्यांनी या मतदारसंघांमध्ये अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यांचा जनसंपर्क मोठा असून प्रत्येक गावी त्यांनी कामाच्या माध्यमातून मोठे नेटवर्क उभा केलेले आहे. त्यामुळे ते या मतदारसंघात निवडणूक लढवून मोठ्या मताधिक्याने निवडून येतील असा सूर नागरिकांमधून निघत आहे.

# विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने अभ्यास करून विद्यार्जन करावे : संतोष पाटील

## येरगी येथे वसंत पंचमी उत्साहात साजरी

देगलूर (प्रतिनिधी): संपूर्ण तालुक्यात फक्त येरगी येथे चालुक्य कालीन सरस्वतीचे मंदिर असून सर्व विद्यार्थ्यांना विद्येची देवता सरस्वती मातेला प्रसन्न करून घ्यायचे असेल तर विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने अभ्यास करून विद्यार्जन करावे असे आवाहन सरपंच संतोष पाटील यांनी येरगी येथे वसंत पंचमी निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

देगलूर तालुक्यातील येरगी येथे चालुक्य कालीन सरस्वतीचे एकमेवाद्वितिय मंदिर असून ,काल शुक्रवारी वसंत पंचमी(सरस्वती जन्मोत्सव) च्या दिवशी शाळेतील विद्यार्थी व ग्रामस्थांनी येथील सरस्वती मंदिरात जाऊन वस्त्र अर्पण करून विधिवत पूजा अर्चना केली.

गावचे सरपंच संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील वसंत पंचमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.




सर्व विद्यार्थ्यांनी सरस्वती मंदिराच्या प्रांगणात पोहोचल्यानंतर सरस्वती मातेचे दर्शन घेतले तत्पूर्वी सर्व उपस्थितांनी सरस्वती या मूर्तीचे पूजन केले.यावेळी विद्यार्थ्यांनी सरस्वतीचे स्तवन केल. शाळेतील निरागस विद्यार्थ्यांनी चांगली बुद्धिमत्ता प्राप्त होण्यासाठी बुद्धीची देवता सरस्वती मातेची प्रार्थना केली.

यावेळी सरपंच संतोष पाटील यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना भेट स्वरुपात वही व पेन देण्यात आले,यामुळे सर्व विद्यार्थी आनंदित झाले होते. यावेळी गावातील महिला - पुरुष नागरिक, लहान थोर मंडळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी विद्यमवार यांनी केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नागोराव चव्हाण,सह शिक्षिका वैशाली सागावे,बालिका पंचायत राज समितीच्या सचिव महादेवी दाणेवार,अंगनवाडी चे गंगामणी दारलावार, हाणमाबाई बरसमवार,मजुळासिलमकुटवार, नागमणी बरसमवार, प्रणिता बरसमवार,बचतगटचे पिआरसी मयना वाघमारे आदी उपस्थित होते.

# भक्तिमय वातावरणात शिवनाम सप्ताह ची सांगता महिला भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

हणेगाव(प्रतिनिधी): तालुक्यातील गणेगाव येथे ३५ वा अखंड शिवनाम सप्ताह व २७ वां पट्टाभिषेक सोहळा सांगता शुक्रवार रोजी भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.

हणेगाव हिरेमठ संस्थान चे मठाधिपती श्री. ष.ब्र. १०८ शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे पादुका पुजनानंतर मन्मथ स्वामी पालखी मिरवणूक सुरुवात करण्यात आले गावातील मुख्य मार्गावरून पादुका पूजन व पालखी दर्शन साठी भक्तांची मोठी गर्दी होती शिवलिंग शिवाचार्य महाराज की जय,गुरुराज माऊली ,गुरुदेव तुम्हारी जय जय हो, हर हर महादेव च्या निनादाने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी महिला वर्गांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. मन्मथ स्वामी मंदिर ठिकाणी महाआरती नंतर सिध्देश्वर मंदिर येथे श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे आशिर्वचनानंतर महाप्रसाद कार्यक्रम संपन्न झाला.

डॉ.आनंद चिद्रावार यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. सांगता कार्यक्रमास शिवनाम सप्ताह चे अध्यक्ष प्रशांत देशमुख,उपाध्यक्ष योगेश देशमुख, भजनी मंडळ अध्यक्ष उमाकांत होडगे,इरप्पा निलंगे ,प्रशांत वट्टमवार,प्राचार्य शंकरराव राठोड,विजयकुमार वंटगिरे, रतिकांत होडगे, पुरुषोत्तम अन्सापुरे,रमाकांत फुलारी,संतोष भाये,इरसंग यनगुंदे,राजकुमार मैंसुरे, गौरेश रावणगावे, महालिंग स्वंतकर,हणमंत बनीमटे, अभिषेक उप्पे,नागेश घुळे व महिला भजनी मंडळी सहभागी झाले होते.

अखंड शिवनाम सप्ताह व त्यानिमित्त आयोजित कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील सर्व महिला - पुरुष ,युवक जी युवती आदींनी परिश्रम केले.

# भजन, सुंदर कांड, अथर्वशीर्ष पठनाने गणेश जयंती साजरी

धाराशिव दि. २४ (प्रतिनिधी) शहरातील गवळी गल्लीतील धाराशिवचा महाराजा व मानाचा गणपती गणल्या गेलेल्या श्री बाल हनुमान गणेश मंडळाच्या रंगमंचकासमोर गणेश जयंती अत्यंत आनंदीमय व भक्तिभावाच्या वातावरणामध्ये पार पडली.

गणेश जयंतीनिमित्त मंडळ गेल्या ६२ वर्षापासून धाराशिवकारांची सेवा करीत आहे. भक्तांच्या भक्तीने व शक्तीने सेवा करण्याची संधी मंडळाला अखंडपणे आज तागायात चालू ठेवलेली आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले विद्यार्थ्यांना बालविवाह मुक्त भारत व नशा मुक्त भारत झाला पाहिजे आणि हा संस्कार याच वयात ज्ञात करून दिला गेला पाहिजे. शाळेतून विद्यार्थ्याला अनिष्ट रूढी, प्रथा व परंपरा या थांबवल्या गेल्या पाहिजेत यासाठी मंडळ जनजागृती प्रबोधन करण्याचा प्रयत्न करीत आहे. खाऊ वाटपाच्या वेळी मंडळाचे संस्थापक सदस्य मूर्तिकार चित्रकार व कलाकार काशिनाथ दिवटे व प्रा. गजानन गवळी विष्णुदास सारडा सोमेश्वर पाळणे यांच्या हस्ते वाटप करून गजानन ६४ कलेची देवता व प्रारंभ पूजा स्थान देवता यांचा आशिर्वाद मिळावा व शिक्षणाने भारत देशाला सुनागरिक मिळावेत असे सांगितले. दुपारी दोन वाजता बालाजी नगर शेकापूर येथील संत माऊली महिला भजनी मंडळाच्या सविता दंडनाईक यांनी भजननातून विविध गीतांद्वारे भक्ती सादर केली. श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ धाराशिव राजश्री दिवाकर यांच्या मंडळाने सुंदर कांड वाचन श्री गजानन व हनुमानाच्या चरणी आपली भक्ती अर्पण केली. अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम व फलश्रुती करण्यासाठी महिला मंडळांनी फारच गर्दी केली होती यावेळी वलगुड येथील मुलींचा चमू (१५) येऊन अथर्वशीर्ष पुढाकाराने पार पाडले. सामुदायिकरित्या धार्मिक व प्रफुलित वातावरणामध्ये संपन्न झाली. तर नवस व संकल्प पूर्ण झाल्याबद्दल ३२ किलो वजनाचा पितळेचा २ फूट उंचीचा मूषक उंदीर विधीवत पूजा करून श्री चरणी अर्पण करून स्नेहा श्रीकांत दिवटे या दांपत्यांना मान मिळाला. यावेळी नगराध्यक्ष नेहा काकडे, उपाध्यक्ष अक्षय ढोबळे, राष्ट्रीय व्हालीबॉल स्पर्धेत भारतीय संघामध्ये प्रतिनिधित्व केलेल्या गायत्री नांदे, महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड झाल्याबद्दल श्रेयस खांडेकर, राष्ट्रीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करणारी खेळाडू संस्कृती कपाळे, महाराष्ट्र क्रिकेट संघटना आजीव सभासद रोहित बागल, मध्यवर्ती शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष आकाश कोकाटे, धाराशिव शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे अध्यक्ष अमोल शिरसट, पुरोहित शाम दहिटणकर, बंडू जोशी, तेजस्विनी बचुटे, सविता दंडनाईक व शैलाताई शिरपूरकर, आरती कुलकर्णी, बोपलकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा. गजानन गवळी, काशिनाथ दिवटे, युवराज हुच्चे, विश्वास दळवी, दुर्गेश दिवटे, वरुण साळुंके, श्रीकांत दिवटे, सुनील देवळे, ऋषिकेश चवडके, रणजीत बुरुंग, आकाश महामुनी, उज्वला दिवटे, निर्मला गवळी, गौरी कुलकर्णी, अनुराधा पाळणे, कल्याणी उपाध्ये, सरस्वती अंजीखाने, उषा चवंडके, नम्रता हुच्चे, ज्योती गवळी, सुरेखा, पुष्पा हुच्चे, पाळणे, गवळी, वासंती कुलकर्णी यांनी परिश्रम आहे.

पान १ वरून

## पद्म पुरस्कारांची...

चार दशकांहून अधिक काळापासून रघुवीर खेडकर हे तमाशा रंगभूमीवर कार्यरत तमाशा फडातील 'सोंगाड्या'ची भूमिका करणारे कलावंत आणि तमाशा फडचालक 'अखिल भारतीय तमाशा परिषद' या संघटनेचे अध्यक्ष तरुणपणी तमाशात कथ्थक आणि लोककलेचे मिश्रण असलेले थाळीनृत्य करण्यासाठी लोकप्रिय.

## जाणून घ्या कशी...

७ वाजता प्रसारित केले जाईल आणि सर्व दूरदर्शन वाहिन्यांवर हिंदीमध्ये प्रसारित केले जाईल, त्यानंतर इंग्रजी आवृत्ती प्रसारित केली जाईल. त्यानंतर संध्याकाळी दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या प्रादेशिक नेटवर्कवर प्रादेशिक भाषेतील प्रसारणे प्रसारित केली जातील.

युरोपियन कौन्सिलचे प्रेसिडेंट अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन युनियनच्या प्रेसिडेंट उर्सुला वॉन डेर लेयन हे २०२६ च्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. परंपरेनुसार, राष्ट्रध्वज फडकवला जाईल, त्यानंतर राष्ट्रगीत आणि स्वदेशी १०५-मिमी लाईट फील्ड गन वापरून २१ तोफांची सलामी दिली जाईल. दरवर्षीप्रमाणे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन लाल किल्ल्यावर येतील. राष्ट्रपती, विशेष आणि पंतप्रधान आणि इतर मान्यवर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत परेड होणार आहे.

जागतिक अॅथलेटिक पॅरा चॅम्पियनशिपचे विजेते, नैसर्गिक शेती करणारे शेतकरी, पीएम स्माइल योजनेअंतर्गत पुनर्वसन केलेले ट्रान्सजेंडर आणि भिकारी, गगनयान, चांद्रयान इत्यादी अलीकडील इस्रो मोहिमांमध्ये सहभागी असलेले सर्वोत्तम कामगिरी करणारे शास्त्रज्ञ/तांत्रिक व्यक्ती, राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनमध्ये डखत्रक्ष्ढ (स्ट्रॅटेजिक इंटरव्हेंशन फॉर ग्रीन हायड्रोजन ट्रान्झिशन) कार्यक्रमांतर्गत हायड्रोजन उत्पादन आणि इलेक्ट्रोलायझर उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळालेल्या कंपन्यांचे प्रमुख/सीईओ आणि प्रमुख प्रकल्पांमध्ये काम करणारे डीआरडीओचे सर्वोत्तम कामगिरी करणारे शास्त्रज्ञ/तांत्रिक व्यक्ती आदी दहा हजार मान्यवर पाहुण्यांना परेड बघण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर देशभर कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. महत्त्वाच्या तसेच संवेदनशील ठिकाणी कसून तपासणी सुरू आहे. ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे घडामोडींवर लक्ष ठेवले जाईल. परेड मार्गावर १,००० हून अधिक हाय-डेफिनिशन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत आणि रिअल-टाइम मॉनिटरिंगसाठी फेशियल रेकग्निशन सिस्टम पण सक्रीय केली आहे. दिल्ली पोलीस संभाव्य धोके शोधून त्या विरोधात कारवाईसाठी ख चा वापर करणार आहेत. दिल्लीत ठिकठिकाणी सीसीटीव्ही नियंत्रण कक्षांची स्थापना केली आहे. दिल्ली पोलीस, निमलष्करी दल आणि विशेष युनिट्सचा समावेश असलेले बहुस्तरीय सुरक्षा ग्रिड चोख बंदोबस्त ठेवणार आहे. कर्तव्य पथ आणि लगतच्या भागात वाहतूक निर्बंध आणि नियंत्रित क्षेत्रे लागू केली जातील, नागरिकांसाठी सूचना जारी केल्या जातील. दिल्ली मेट्रो तसेच दिल्लीतील रस्ते मार्गांवरील वाहतुकीत बदल केला जाईल. या बदलांच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

परेड सकाळी साडेनऊ वाजता सुरू होईल, ज्याचे लाईव्ह टेलिव्हिजन कव्हरेज सकाळी साडेदहा वाजता सुरू होईल. प्रवेशद्वार सकाळी ७ वाजता उघडतील. २९ भारतीय हवाई दलाच्या विमानांच्या फ्लायपास्टने उत्सवाचा समारोप होईल. उल्लेखनीय म्हणजे, या वर्षी भारतीय हवाई दल (खऋ) प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये सिंदूर फॉर्मेशन दाखवेल. या फॉर्मेशनमध्ये दोन राफेल जेट, दोन डण-३० विमान, दोन मिग-२९ लढाऊ विमान आणि एक जग्वार लढाऊ विमान असेल. तर अडीच हजार सांस्कृतिक कलाकार कर्तव्य पथावर सादरीकरण करतील.

पहिल्यांदाच, भारतीय सैन्याच्या रिमाउंट अँड व्हेटर्नरी कॉर्प्सने प्रशिक्षित केलेल्या प्राण्यांची तुकडी परेडमध्ये सहभागी होणार आहे. यात दोन बॅक्ट्रियन उंट, चार झंस्कर घोडे, चार राप्टर, दहा भारतीय जातीचे लष्करी कुत्रे आणि आधीच सेवेत असलेले सहा पारंपारिक लष्करी कुत्रे असतील, जे लडाख आणि सियाचीन सारख्या अत्यंत उंच प्रदेशात प्रभावी कामगिरी करतात. डीआरडीओ लांब पल्ल्याचे जहाजविरोधी हायपरसोनिक क्षेपणास्त्र, पाणबुडी विरोधी क्षेपणास्त्र तसेच आधुनिक नौदल तंत्रज्ञानाचे सादरीकरण करणार आहे. अग्निवीर भारतीय हवाई दलाच्या मार्चिंग बँडचा भाग म्हणून सहभागी होतील. प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये महिला अग्निवीर बँड सादरीकरणात भाग घेणार आहेत. एकूण ६६ अग्निवीर परेडमध्ये सहभागी होणार आहेत. यातील नऊ अग्निवीर वाद्यवृंद पथकात असतील.

परेडनंतर, २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर 'भारत पर्व' हा सांस्कृतिक सोहळा रंगणार आहे. यात देशाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा बघायला मिळेल. प्रजासत्ताक दिनाशी संबंधित फोटो, व्हिडीओ बघता येतील. प्रादेशिक पाककृती, हस्तकला, सांस्कृतिक सादरीकरणे यांचा आनंद घेता येईल. प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा समारोप २८ जानेवारी रोजी होणार आहे.

## इंडिगोचे ७१७...

या सहा प्रमुख मेट्रो विमानतळांवर आहेत. यामध्ये हैदराबाद आणि बंगळूरु येथे सर्वाधिक स्लॉट उपलब्ध असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. हे स्लॉट जानेवारी ते मार्च या कालावधीसाठी रिकामे करण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर नागरी उड्डाण मंत्रालयाने तात्काळ हालचाली सुरू करत इतर विमान कंपन्यांकडून या स्लॉटसाठी अर्ज मागवले आहेत. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि हवाई सेवा सुरळीत ठेवण्यासाठी इतर एअरलाईन्सनी या रिकाम्या स्लॉटचा वापर करावा, अशी सरकारची भूमिका आहे. त्यामुळे येत्या काळात काही मार्गांवर इतर विमान कंपन्यांच्या अतिरिक्त उड्डाणांची शक्यता निर्माण झाली आहे.

## राज्यातून...

विभागाने वर्तवली आहे.

राज्यात मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यासह अंशत: ढगाळ हवामान होत आहे. पहाटेच्या वेळी धुके आणि दुपारच्या वेळी उन्हाचा चटका वाढून, काहीसा उकाडा अनुभवायला मिळत आहे. किमान तापमानात वाढ कायम राहणार असून थंडी कमी-अधिक होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

वातावरणात सतत होणा-या बदलामुळे नागरिक हैराण झाले आहेत. ऐन थंडीत उन्हाचा चटका आणि अवकाळी पडणारा पाऊस अशा संमिश्र वातावरणाने नागरिकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे.

बदलत्या वातावरणाचे आजारांना निमंत्रण

नागपूरमध्ये नववर्षाच्या पहिल्या २२ दिवसांतच स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण समोर आले असून शहरात स्वाईन फ्लूचे दोन रुग्ण आढळले. त्यानंतर आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून थंडीच्या काळात विषाणूजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. शिवाय थंडीचा काळ स्वाईन फ्लूसाठी पोषक ठरणारा असतो. तापमान घटल्याने संसर्ग वाढण्याचा धोका तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.

## प्रवाशांच्या...

कर्मचाऱ्यांसह प्रवाशांसाठीही एक स्मार्ट सहाय्यक म्हणून काम करतो.

प्रवाशांशी साधणार संवाद

या यंत्रमानवाच्या प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये चेहरा ओळख प्रणालीद्वारे घुसखोरी शोधणे, एआय-आधारित गर्दी घनता विश्लेषण, इंग्रजी, हिंदी आणि तेलुगू भाषांमध्ये बहुभाषिक सार्वजनिक घोषणा, तसेच अडथळे टाळत अर्धस्वायत्त पद्धतीने प्लॅटफॉर्मवर गस्त घालण्याची क्षमता यांचा समावेश आहे. याशिवाय, एकात्मिक डॅशबोर्डच्या माध्यमातून रिअल-टाइम परिस्थितीची जाणीव, आग व धूर ओळखून तत्काळ इशारे देणे, तसेच मैत्रीपूर्ण हालचाली आणि माहितीच्या सहाय्याने प्रवाशांशी संवाद साधण्याची क्षमताही या यंत्रमानवात आहे.

## भाजपने केवळ ...

प्रश्न: ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगार निर्मितीच्या बाबतीत सरकारकडे कोणतेही ठोस धोरण नाही. काँग्रेस आघाडी नेहमीच सर्वसामान्यांच्या हितासाठी लढत आली असून, विकासाचा हा वारसा पुढे नेण्यासाठी काँग्रेस उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन करण्यात आले. लातूर ग्रामीण भागातील जनतेने भाजपच्या अपयशी कारभाराला चोख प्रत्युत्तर देऊन काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना ५ फेब्रुवारी रोजी हाताच्या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी केले. या सभेला ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

## सिध्देश्वर यात्रा...

यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विविध समित्या गठीत होत असून या समितीतील प्रत्येक सदस्यांनी योगदान द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

यात्रा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी या बैठकीत विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून यामध्ये झेंडा मिरवणूक, यात्रा स्टॉल, पशु व कृषी प्रदर्शन, कुस्ती, भोजन, भजन व किर्तन, अभिषेक, संरक्षक, स्वयंसेवक, विद्यूत व पाणी पुरवठा, प्रसाद वाटप, पास दर्शन, रुद्राभिषेक व महिला स्पर्धा, रचना व सजावट आणि प्रसिध्दी समितीचा समावेश आहे. या समितीच्या माध्यमातून यात्रा महोत्सव यशस्वी करून महोत्सवाची गौरवशाली परंपरा जोपासली जाईल, असा विश्वास या समितीचे प्रमुख व समिती सदस्यांनी व्यक्त केला आहे.

## शेतकऱ्यांच्या...

यावेळी पूढे बोलतांना आमदार अमित देशमुख म्हणाले की, देशाचे माजी गृहमंत्री आदरणीय शिवराज पाटील साहेब यांच्या पुढाकारातून उभारलेला जय जवान जय किसान कारखाना अनेक वर्ष बंद आहे मात्र सत्तेवर असलेल्या भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने तो सुरू करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. मध्यंतरी आपण हा कारखाना चालू करण्यासाठी पुढाकार घेतला परंतु याच मंडळीनी त्याला खोडा घातला, आत्ता पुन्हा लोकांच्या आग्रहास्तव हा कारखाना चालू करण्यासाठी आपण पुढाकार घेणार आहोत असे सांगून, महामार्गाच्या जवळ असलेल्या नळेगाव परिसरात औद्योगिक वसाहत उभा करण्याच्या दृष्टीने ही आपले प्रयत्न सुरू आहेत, यातून कृषी पूरक उद्योगाला येथे चालना मिळणार आहे, शिवाय शेतकऱ्यांच्या मुलांच्या हाताला कामही मिळेल असेल असे यावेळी बोलताना सांगितले,

आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना, लातूर जिल्हा परिषदेचा लौकिक राज्यात आणि देशात निर्माण झाला होता, भविष्यात पारदर्शक, भ्रष्टाचार मुक्त, गतिमान प्रशासनातून देऊन लौकिक पुन्हा मिळवण्यासाठी, नळेगावसह या परिसरातील सर्व काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या पक्षाच्या उमेदवारांना मतदारांनी प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन याप्रसंगी बोलताना केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री, माजी आमदार विनायकराव पाटील म्हणाले की, लातुर जिल्हा परिषदेच्या नळेगाव गटातील महाविकास अघाडी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार प्राचारार्थ आज या ठिकाणी एकत्रित जमलो आहोत. भाजप सरकारच्या आणि महायुतीच्या विरोधात आज सर्वत्र प्रंचड मोठी लाट उसळली असून आपल्याकडील नेत्याला त्यांच्या पुतण्याच्या पलीकडे अन्य कोणत्याही उमेदवार माहिती नाही आणि ते आज अहमदपूर व चाकूर मध्ये स्वतःच्या विकासाच्या पलीकडे त्यांना काहीच दिसत नाही हे आपण सद्या पाहतो आहे. ते आपल्या भाषणात सांगत आहेत येणाऱ्या ५ तारखे पर्यंत आपण मतदार जे सांगाल ते आम्ही जरूर पूर्ण करु पण त्यानंतरच्या काळात हे नेते आपले अजिबात ऐकणार नाहीत तर पुढील ५ वर्ष आपल्याला त्यांचे ऐकावे लागेल, मागील काळात आपण विकासापासून वंचित राहिलो असेच यापुढेही आपल्याला राहण्याची वेळ यईल याचा विचार आपण आता या निवडणुकीत करावा आणि आपली ताकद आमच्या काँगेस अघाडीच्या उमेदवारांच्या पाठीशी उभे राहावे आणि आपल्या सर्व उमेदवारांना या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत विजयी करावे आनी आपल्या जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये पाठवावे अशी विनंती त्यांनी यावेळी केली.

दरम्यान नळेगाव येथील रहिवाशी संजय सौदागर यांच्या दुःखद निधनाबद्दल या सभेत शोक व्यक्त करीत उपस्थित सर्वानी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी काँग्रेस पक्षाचे उमेदवार अमजद घोरवाडे, अनिल चव्हाण, एन.आर. पाटील, असगर पटेल यांनी आपले मनोगत व्यक्त करीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आघाडीच्या सर्व उमेदवाराना प्रचंड मतांनी विजयी करून मतदार व आपल्या मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत पाठवावे अशी विनंती सभेतील उपस्थित सर्व मतदार बंधू भगिनींना केली.

या कार्यक्रमास चंद्रकांत बाजपल्ले, संतोष पाटील, गोविंद धोत्रे,दिगंबर हुडगे, दाऊद बागवान, धनंजय कोरे, गंगाधर केराळे, शिवाजी गायकवाड, संजय पवार, पप्पू शेख, दयानंद सुर्यवंशी यांच्यासह लातूर जिल्हा परिषद आणि चाकूर पंचायत समिती निवडणुकीतील काँग्रेस महाविकास आघाडीचे नळेगाव जि.प. गटातील उमेदवार अनिल विश्वनाथ चव्हाण, नळेगाव पं.स. अमजद घोरवाडे, सुगाव पं. स. गणातील अशोक पांडुरंग नागिमे, तसेच जानवळ जिल्हा परिषद गटातील नागनाथ रामराव पाटील, जानवळ पं.स गणातील प्रतिभा गणपत सूर्यवंशी, झरी (बु) पं.स.गणातील अमृता जळबा खंदारे, आणि वडवळ (ना.) जि.प. गटातील उमेदवार माधव निवृत्ती कोळगावे, वडवळ (ना.) गणातील राजाबाई रोहिदास कसबे, आष्टा पं.स. गणातील ज्योती शिवाजी शेळके आदी उपस्थित होते.

# शेत शिवारातील मोटारी, पशुधन चोरणारी टोळी गजाआड

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर: लातूर जिल्ह्यातील शेतशिवारात असलेल्या पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी तसेच हॉटेल व बिअर बार फोडून विदेशी दारू चोरी करणाऱ्या संघटित टोळीवर लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून चार सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून तब्बल ९ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थागुशाचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात विशेष पोलीस पथकाची निर्मिती करण्यात आली. सदर पथक मुरुड-अकोला परिसरात लातूर जिल्ह्यात घडलेल्या शेतातील साधनसामग्री चोरीतील संशयित गुन्हेगारांचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली रस्त्यावर करकटा पाटी येथील की, लातूर ते मुरुड जाणाऱ्या एका बार समोर पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहना सह चार संशयित इसम संशयास्पदरीत्या थांबले आहेत. या माहितीच्या आधारे तात्काळ नियोजनबद्ध सापळा रचून संशयितांना वाहनासह ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्यांमध्ये महादेव उर्फ बापु सुरेश चव्हाण (वय ४५) रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी, जि. धाराशिव, राहुल निवत्ती काळे (वय २३) रा. साठे चौक, धाराशिव, जि. धाराशिव, तेजस उर्फ पप्पु भिमराव शिंदे (वय ३५) रा. पिंपळगाव, ता. वाशी, जि. धाराशिव, नितीन गजेंद्र काळे (वय ३२) रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी, जि. धाराशिव यांचा समावेश आहे.

वरील सर्वांची अंगझडती व वाहन तपासणी केली असता त्यामध्ये १ लाख ५७ हजार रूपये, ५ एचपी क्षमतेच्या १० पाणबुडी मोटारी, विदेशी दारूचे २३ बॉक्स, गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेले महिंद्रा कंपनीचे बोलेरो पिकअप वाहन (एम. एच. ४४ यू १३१६) असा मुद्देमाल मिळून आला. नमूद आरोपींची सखोल चौकशी केली असता आरोपींनी कबुली दिली की, ते आपल्या इतर तीन फरार साथीदारांसह गेल्या एक वर्षापासून लातूर, धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी चोरी करीत होते. तसेच काही दिवसांपूर्वी वैराग जिल्हा सोलापूर परिसरातील एक बिअर बार अँड परमिट रूम फोडून मोठ्या प्रमाणावर विदेशी दारू चोरी केली होती. विविध चोरीचा माल विकून मिळालेली रक्कमच त्यांच्या ताब्यात आढळून आलेली रोख रक्कम असल्याचे सांगितले.

आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे जिल्ह्यातील पुढील पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांशी त्यांचा थेट संबंध असल्याची खात्री झाली वरील आरोपींनी पो.स्टे. मुरुड, शिरूर अनंतपाळ, अहमदपूर, कासार शिरसी, वैराग (जि. सोलापूर) इत्यादी ठिकाणी दाखल असलेले एकूण १० गंभीर गुन्हे उघड झाले असून या कारवाईत एकूण १० पाणबुडी मोटारी ७१,८००/-, विदेशी दारू : आरोपींना पुढील कारवाई करिता पोलीस स्टेशन मुरुड गुन्हा क्र. ३९३/२०२५, कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये हजर करण्यात आले आहे. त्यांच्या फरार साथीदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके रवाना



करण्यात १,९७,४४०/-, रोख रक्कम : १,५७,०००/-, बोलेरो पिकअप वाहन: ५,००,०००/- एकूण किंमत: ९,२६, २४०/- (नऊ लाख सव्वीस हजार दोनशे चाळीस रुपये) असा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चारही आली असून, लवकरच त्यांनाही अटक करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, अमर केंद्रे, राजेश घाडगे, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, तुराब पठाण, रामलिंग शिंदे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, तुळशीराम बरूरे, पाराजी पुट्टेवाड, गणेश साठे, गोविंद भोसले, चंद्रकांत केंद्रे, प्रदीप चोपणे, श्रीनिवास जांभळे, शैलेश सुडे, अंजली गायकवाड यांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय शैक्षणिक स्पर्धेस मोठा प्रतिसाद

धाराशिव (प्रतिनिधी) - हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाणारे शीख धर्माचे ९ वे गुरु श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्यांच्या त्यागशील जीवनकार्याचा, तत्त्वज्ञानाचा व सामाजिक योगदानाचा प्रसार विद्यार्थ्यांमध्ये व्हावा, या उदात्त उद्देशाने अल्पसंख्यांक विभाग तसेच राज्यस्तरीय समागम समिती, महाराष्ट्र राज्य शासन व जिल्हा परिषद धाराशिव (शिक्षण विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

र न या जिल्हास्तरीय स्पर्धा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागेश मापारी यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आल्या. जिल्हा परिषद कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत या स्पर्धा पार पडल्या. स्पर्धांचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती सुधा साळुंके यांच्या हस्ते करण्यात आले.

साळुंके म्हणाल्या की, श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांचे जीवन हे त्याग, सत्य आणि मानवतेचे तेजस्वी प्रतीक आहे. त्यांच्या विचारांतून विद्यार्थ्यांना धैर्य, मूल्यनिष्ठा व सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळते. अशा उपक्रमांमुळे इतिहास जिवंत राहतो आणि नव्या पिढीला योग्य दिशा मिळते. यावेळी स्पर्धा प्रमुख विस्तार अधिकारी (शिक्षण) रंजना मैंदर्गी, भैरवनाथ कानडे, केंद्र प्रमुख निलेश नागले, लक्ष्मण पाटील, समीर जाधव, बी.एम. आडगळे, समीर सय्यद, सुहास लोमटे, राजाभाऊ गिरी, विनोद जानराव, मुख्याध्यापिका सुनीता इंगळे व राजेंद्र अत्रे आदी उपस्थित होते. या जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये वक्तृत्व, गायन चित्रकला व निबंध लेखन स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विस्तार अधिकारी रंजना मैंदर्गी यांनी सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी व आभार समीर जाधव यांनी मानले. विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून श्री गुरु तेग बहाद्दर साहेबजी यांच्या शौर्य, बलिदान, धर्म स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान तसेच सर्व धर्म समभाव व मानवतेचा संदेश प्रभावीपणे मांडला. वक्तृत्व स्पर्धेत ओघवत्या भाषेत विचारांची प्रभावी मांडणी करण्यात आली. गायन स्पर्धेतून भक्ती व देशप्रेमाची भावना व्यक्त झाली. चित्रकलेतून त्याग व शौर्याचे दृश्यरूप साकारले गेले. तर निबंध लेखनातून विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण व चिंतनशील दृष्टी अधोरेखित झाली.

# दानपेटीतील अंगठी प्रकरणी मंदिर संस्थानची भूमिका मांडली

धाराशिव (प्रतिनिधी) - दानपेटीमध्ये चुकून पडलेल्या मौल्यवान वस्तूंविषयी गेल्या दोन दिवसांपासून काही प्रसारमाध्यमांमध्ये वस्तुस्थिती न तपासता अपूर्ण व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध होत असल्याच्या पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी अधिकृत खुलासा प्रसिद्ध केला आहे.

पुण्यातील भोसरी येथील भाविक सुरज कृष्णा टिंगरे हे दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४:१५ ते ४:३० या वेळेत श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले होते. दर्शनावेळी त्यांनी दानपेटी क्रमांक १२ मध्ये दान स्वरूपात काही रक्कम टाकत असताना त्यांच्या बोटातील सोन्याची अंगठी चुकून दानपेटीत पडल्याचा या दावा केला आहे. सदर अंगठी परत मिळावी यासाठी त्यांनी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या कार्यालयाकडे लेखी विनंती अर्ज सादर केला होता. या अर्जाच्या अनुषंगाने, दि. ३ ऑगस्ट २०१७ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील ठरावाचा संदर्भ मंदिर संस्थानने दिला आहे. या ठरावानुसार, श्री तुळजाभवानी देवींच्या दानपेटीत भाविकांकडून नजर चुकीने पडलेल्या मौल्यवान वस्तू या दान स्वरूपात समजण्यात येतील व त्या परत देण्यात येणार नाहीत, असा स्पष्ट निर्णय घेण्यात आलेला आहे.



कृष्णा टिंगरे यांना मंदिर निर्णयानुसार, सुरज संस्थानच्यावतीने दि.१६ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृत पत्राद्वारे ही बाब कळविण्यात आली आहे. मात्र, या प्रकरणाबाबत काही प्रसारमाध्यमांनी वस्तुस्थिती न तपासता बातम्या प्रसिद्ध केल्याने भाविकांमध्ये गैरसमज निर्माण होत असल्याचे मंदिर संस्थानने नमूद केले आहे. मंदिर संस्थानने स्पष्ट केले आहे की, यापूर्वी अशा प्रकारच्या घटनांचा गैरफायदा घेण्याचे प्रकार समोर आलेले आहेत. काही अपप्रवृत्तीचे लोक चुकून दानपेटीत मौल्यवान वस्तू पडलीअसा दावा करून दानपेटीतून मौल्यवान वस्तू मिळवण्याचा प्रयत्न करत होते. अशा प्रकारची फसवणूक रोखण्यासाठी तसेच दानपेटीतील पारदर्शकता व सुरक्षितता राखण्यासाठीच हा नियम करण्यात आलेला आहे. हे विशेषत्वाने नमूद करण्यात आले आहे की, असा नियम करणारे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान हे एकमेव संस्थान नाही तर देशातील अनेक देवस्थानांनीदेखील याच धर्तीवर असे नियम अमलात आणलेले आहेत. त्यामुळे प्रसार माध्यमांनी वस्तुनिष्ठता, अधिकृत कागदपत्रे व मंदिर संस्थानची भूमिका समजून घेऊनच बातम्या प्रसिद्ध कराव्यात, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच, भाविक भक्तांनी दानपेटीमध्ये दान करताना दागिने व मौल्यवान वस्तूंबाबत विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहनही श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्यावतीने केले आहे.

# महापौर निवड कार्यक्रम जाहीर

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : लातूर शहर महानगरपालिका महापौर, उपमहापौर निवडीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.

त्यानुसार २७ ते २८ जानेवारी महापौर / उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. ३० ते ३१ जानेवारी या दरम्यान महापौर व उपमहापौर पद निवडीसाठी नवनिर्वाचीत सदस्यांची बैठक घेण्यात येऊन या बैठकीत महापौर व उपमहापौर पदाची निवड करण्यात येणार आहे. लातूर महानगरपालिकेत काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीस स्पष्ट बहुमत मिळाले आहे. लातूरचे महापौर पद हे अनुसूचीत जाती महिलेसाठी आरक्षीत आहे. स्पष्ट बहुमत असलेल्या या लातूर महापालिकेत महापौर निवडीचे अधिकार काँग्रेस नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत माजी मंत्री आ. अमित देशमुख यांना देण्यात आले आहेत. लातूरचा महापौर पाच महिलांपैकी कोण होणार याची उत्सुकता आहे. सोबतच काँग्रेस पक्ष उपमहापौर म्हणून अनुभवी नगरसेवकाची निवड करण्याची शक्यता आहे. मोठ्या प्रमाणात पदाधिकारी निवडीबाबत लातूर शहराच्या राजकारणात उत्सुकता लागली आहे.

# विवेक सौताडेकर यांना पीएच.डी.पदवी प्रदान

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विद्या शाखा अंतर्गत लातूरचे साहित्यिक व इतिहास संशोधक विवेक सयाजीराव सौताडेकर यांनी हिंदी और मराठी उपन्यासों में छत्रपती शिवाजी : एक तुलनात्मक अध्ययन या विषयावर संशोधन पूर्ण करुन प्रबंध सादर केला.त्यामुळे विद्यापीठामार्फत अनेक तज्ज्ञांच्या उपस्थितीमध्ये त्यांची मौखिक परिक्षा (vivo) घेऊन स्वा. रा.ती.म.विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.त्यांचे पीएच.डी. चे मार्गदर्शक म्हणून किल्लारी येथील शहीद भगतसिंग महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. हणमंत पवार यांनी काम पाहिले.

मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मार्फत प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ.अपर्णा पाटील,मौखिक परिक्षेच्या अध्यक्षस्थानी स्वा.रा.ती.म.नांदेड



येथील भाषा विभागाचे संचालक डॉ.दिलीप चव्हाण, मार्गदर्शक प्रोफेसर डॉ. हणमंत पवार तसेच माजी अधिष्ठता प्राचार्य डॉ .नागोराव कुंभार , डॉ .रणजीत जाधव,प्राचार्य डॉ. संग्राम मोरे, डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ. गणपतराव माने, डॉ.देवकांत गुरव, डॉ. ज्ञानेश्वर देशमुख, डॉ. रामभाऊ मुटकुळे, डॉ.नयन राजेमाने ,प्रा.जयश्री भताने,आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रबंधासाठी देशभरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदी व मराठी साहित्यातील अनेक दुर्मिळ संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला आहे. हिंदी विषयातून शिवाजी महाराजांवर केलेले हे विद्यापीठातील पहिलेच संशोधन असून याअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याविषयी हिंदी आणि मराठी भाषा साहित्यातील साधक-बाधक अभ्यास अत्यंत सूक्ष्मपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री.सौताडेकर यांना पीएच.डी. मिळाल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे ,माजी कुलगुरु तथा माजी खासदार डॉ.जनार्दन वाघमारे, प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार, डॉ. निळकंठ उस्तुरे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, कवी् योगिराज माने,डॉ.जयद्रथ जाधव, एल.बी. आवाळे, प्रा.ओमप्रकाश झुरळे, प्रवीण पाटील, प्राचार्य संजय गवई, धनंजय गुडसूरकर, गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे,शिवाजी हांडे, अशोक तोगरे,किरण कुलकर्णी, लक्ष्मीकांत जोगदंड,प्रा.गोपाळ सावंत,संभाजी नवघरे आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# असाक्षर मुक्त गाव करून नवभारत साक्षरता कार्यक्रमाला गती द्यावी

धाराशिव, (प्रतिनिधी) देशाला साक्षरतेच्या दिशेने अधिक सक्षम बनविण्याच्या उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रम संपूर्ण देशभर राबविण्यात येत असून, राज्यात हा कार्यक्रम शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या माध्यमातून प्रभावीपणे अंमलात आणण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रजासत्ताक दिनानिमित्त असाक्षर मुक्त गावाची शपथ घेऊन हा राष्ट्रीय सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत देशातील १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील असाक्षर व अल्पसाक्षर व्यक्तींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देण्यात येत आहे. या कार्यक्रमामध्ये केवळ अक्षरओळख मर्यादित न ठेवता, जीवनोपयोगी कौशल्यांच्या विकासालाही प्राधान्य देण्यात आले आहे. यामध्ये आर्थिक साक्षरता, कायदे विषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जनजागृती, बाल संगोपन व शिक्षण, कुटूंब कल्याण, व्यवसाय व उपजीविकेची कौशल्ये तसेच कला, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, क्रीडा, मनोरंजन आणि स्थानिक नागरिकांना आवड असलेल्या विषयांचा समावेश आहे. नवभारत साक्षरता कार्यक्रम ही योजना दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२७या कालावधीत राबविण्यात येत असून ही योजना सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ग्रामीण व शहरी भागांमध्ये प्रभावीपणे अंमलात आणली जात आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून २६ जानेवारी २०२७ पर्यंत संपूर्ण गाव, कुटूंब व परिसर साक्षर करण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. मी अशी शपथ घेतो/घेते की, माझे संपूर्ण कुटुंब व गाव २६ जानेवारी २०२७ पर्यंत साक्षर करीन. मी स्वतः असाक्षर राहणार नाही व इतरांनाही असाक्षर राहू देणार नाही, अशी साक्षरतेची शपथ सर्व संबंधितांना देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (योजना) यांनी दिली आहे. २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने साक्षरतेचा हा संकल्प नागरिकांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरेल. तसेच असाक्षर मुक्त गाव हे ध्येय साकार करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या आनंद मेळाव्यामध्ये बाजारपेठ सजली

## (व्यावसायिक कौशल्यांना वाव देण्याचा प्रयत्न)



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, दि. २४ जानेवारी : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त स्काऊट-गाईड विभागांतर्गत दि.२४ जानेवारी २०२६ शनिवार रोजी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या आनंद मेळाव्याचे उद्घाटक म्हणून नवनिर्वाचित नगरसेविका रागिनी यादव उपस्थित होत्या तसेच या उद्घाटन प्रसंगी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी, दै. सकाळ वृत्तपत्राचे पत्रकार हरी तुगावकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख, क्रीडाशिक्षक गुरुनाथ झुंजारे यांची उपस्थिती होती.

यावेळी उद्घाटक म्हणून उपस्थित असलेल्या नगरसेविका रागिनी यादव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य निर्माण होण्यासाठी, सांघिकवृत्तीची जोपासना होण्यासाठी तसेच व्यवहार ज्ञान शिकण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असते, असे सांगून या आनंद मेळाव्यातील सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या आनंद मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी अनेक स्टॉल लावले होते. अत्यंत सुंदर सजावट करण्यात आली होती. मुलांनी स्वादिष्ट पदार्थ तयार करून आणले होते. सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या पदार्थांचा आस्वाद घेतला. या आनंद मेळाव्याचे प्रास्ताविक, मान्यवरांचा परिचय व स्वागत रेणुका गिरी यांनी केले. परीक्षक शैला सांगवीकर व शुभांगी रुईकर यांनी या सर्व स्टॉलचे निरीक्षण केले. अत्यंत उत्साहात हा आनंद मेळावा संपन्न झाला. वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त स्काऊट-गाईड विभागांतर्गत संपन्न झालेल्या या आनंद मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख, कार्यक्रम प्रमुख करुणा सातपुते, स्काऊट-गाईड विभागातील विद्यार्थी तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात फर्डिनांड ज्युलियस कोहन यांच्या जयंतीनिमित्त विशेष सेमिनार

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२४ जानेवारी २०२६ रोजी फर्डिनांड ज्युलियस कोहन यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाले अंतर्गत विशेष सेमिनाराचे आयोजन करण्यात आले.हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांच्या हस्ते फर्डिनांड ज्युलियस कोहन यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षातील विद्यार्थीनी श्रुती बिरादार हिने फर्डिनांड ज्युलियस कोहन यांचा जीवनप्रवास,संशोधन कार्य तसेच जैवविविधता,उत्क्रांती सिद्धांत व जैव-भौगोलिक विभागणी क्षेत्रातील त्यांच्या मोलाच्या योगदानावर सविस्तर सादरीकरण केले. सादरीकरणात फर्डिनांड ज्युलियस कोहन हे सूक्ष्मजीवशास्त्राचे जनक मानले जातात.त्यांनी जीवाणूंचे शास्त्रीय वर्गीकरण प्रथम मांडले. जीवाणूंमध्ये बीजुक (स्पोअर्स) तयार होतात हे त्यांनी सिद्ध केले.शैवाल आणि जीवाणूंच्या रचना व जीवनचक्रावर त्यांनी महत्त्वपूर्ण संशोधन केले.त्यांच्या कार्यामुळे आधुनिक जीवाणूशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्राच्या विकासाला मोठी चालना मिळाली ही कल्पना त्यांनी ठामपणे मांडली.त्यांच्या कार्यामुळे आधुनिक जनुकशास्त्र व उत्क्रांती जीवशास्त्राचा पाया घातला गेला.यांच्या जीवनप्रवास,संशोधन कार्य तसेच जैवविविधता,उत्क्रांती सिद्धांत व जैव-भौगोलिक विभागणी क्षेत्रातील त्यांच्या मोलाच्या योगदानावर सविस्तर सादरीकरण केले. त्यांच्या कार्यातून वैज्ञानिक विचारसरणी,तार्किकता व पर्यावरणीय जबाबदारी यांची सांगड घालण्याचा संदेश मिळतो. या सेमिनारमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्क्रांती सिद्धांताविषयी सखोल समज,संशोधनवृत्ती,चिकित्सक विचारशक्ती तसेच जैवविविधता संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होण्यास चालना मिळाली.याप्रसंगी प्रा.ऋतुजा डिग्रसकर,प्रा.तृप्ती सोनकांबळे, प्रा.आऊ येळीकर व इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.